मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!
: 9834138482

www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी-चिंचवड » शुक्रवार, दि. 28 ऑगस्ट 2025 | पान - 1

# पीएमपीएमएल कर्मचाऱ्यांना पेन्शनचा मार्ग मोकळा..!

## २९ वर्षांच्या कायदेशीर लढ्याला यश; सहा महिन्यांत पेन्शन लाभ देण्याचे निर्देश!

» पिंपरी | प्रतिनिधी

**पुणे महानगर परिवहन महामंडळ लिमिटेडच्या (पीएमपीएल) हजारो सेवकांसाठी दिलासादायक निर्णय घेण्यात आला आहे. पीएमपीएल कर्मचाऱ्यांना आता राज्य शासनाच्या नियमांप्रमाणे निवृत्ती वेतनाचे (पेन्शन) लाभ मिळण्याचा मार्ग पूर्णपणे मोकळा झाला आहे. माननीय उच्च न्यायालयाने कर्मचाऱ्यांच्या बाजूने दिलेल्या ऐतिहासिक निकालाची तात्काळ अंमलबजावणी करून संबंधित सर्व कर्मचाऱ्यांना येत्या ६ महिन्यांच्या कालावधीत निवृत्ती वेतनाचे सर्व लाभ अदा करावेत, असे निर्देश पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे स्थायी समिती सभापती तथा पीएमपीएलचे संचालक अभिषेक बारणे यांनी पीएमपीएमएल प्रशासनाला दिले आहेत.**



पुणे महानगर परिवहन महामंडळ लिमिटेड (PMPML) कर्मचाऱ्यांच्या २९ वर्षांच्या प्रदीर्घ पेन्शन लढ्याला अखेर यश मिळाले आहे. उच्च न्यायालयाने कर्मचाऱ्यांच्या बाजूने निर्णय दिल्यानंतर त्यांच्या निवृत्ती वेतनाचा मार्ग मोकळा झाला आहे. या निर्णयाची तातडीने अंमलबजावणी करून संबंधित कर्मचाऱ्यांना सहा महिन्यांच्या कालावधीत पेन्शनचे सर्व लाभ देण्यात यावेत, यासाठी पिंपरी-चिंचवड महापालिकेचे स्थायी समिती सभापती तथा PMPML संचालक अभिषेक बारणे यांनी प्रशासनाकडे जोरदार पाठपुरावा सुरू केला आहे.

याप्रकरणी बारणे यांनी PMPMLचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक (CMD) यांना अधिकृत पत्र पाठविले आहे. उच्च न्यायालयाने याचिका क्र. ५६२७/२०१३ मध्ये दिलेल्या निर्णयानुसार, कर्मचाऱ्यांना सहा महिन्यांच्या विहित कालावधीत निवृत्ती वेतनाचे लाभ देणे आवश्यक असल्याचे त्यांनी प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिले आहे. न्यायालयाच्या आदेशाची पायमल्ली होऊ नये आणि पेन्शन प्रकरणात कोणतीही दिरंगाई होऊ नये, यासाठी तातडीने नियमाधीन कार्यवाही करण्याच्या सूचना त्यांनी केल्या आहेत.

या संघर्षाला २ मे २०१३ रोजी महत्त्वाचे यश मिळाले. औद्योगिक न्यायालय, पुणे यांनी कर्मचाऱ्यांना पेन्शन देण्याचे आदेश दिले. मात्र, या निर्णयाविरोधात PMPML प्रशासनाने उच्च न्यायालयात याचिका दाखल केली. त्यानंतर उच्च न्यायालयाने प्रशासनाची याचिका फेटाळून लावत कर्मचाऱ्यांच्या बाजूने निर्णय दिला. तसेच सहा महिन्यांच्या आत निवृत्ती वेतनाचे लाभ वितरित करण्याचे निर्देश दिले.

यावेळी कर्मचाऱ्यांनी पुष्पगुच्छ देऊन बारणे यांचा सत्कार केला आणि पेन्शनच्या हक्कासाठी दिलेल्या पाठिंब्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. २९ वर्षांच्या संघर्षानंतर न्यायालयीन विजय मिळाल्याने कर्मचाऱ्यांनी समाधान व्यक्त केले.

### २९ वर्षांचा संघर्ष, अखेर न्यायालयीन विजय!


PMPML कर्मचाऱ्यांना पुणे महापालिका, पिंपरी-चिंचवड महापालिका आणि शिक्षण मंडळातील कर्मचाऱ्यांप्रमाणे निवृत्ती वेतनाचा लाभ मिळावा, यासाठी गेल्या २९ वर्षांपासून लढा सुरू होता. पेन्शनचा लाभ न मिळाल्याने अनेक कर्मचाऱ्यांना निवृत्तीनंतर आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत होता.

“पीएमपीएलचे कर्मचारी हे पुणे व पिंपरी-चिंचवड शहराच्या सार्वजनिक वाहतुकीचा मुख्य कणा आहेत. महापालिकेच्या इतर कर्मचाऱ्यांप्रमाणेच पीएमपीएलच्या कर्मचाऱ्यांनाही राज्य शासनाच्या नियमानुसार निवृत्ती वेतनाचे लाभ मिळणे हा त्यांचा हक्क होता. २९ वर्षांच्या प्रदीर्घ लढ्यानंतर मिळालेला हा विजय अत्यंत ऐतिहासिक आहे. माननीय उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार कर्मचाऱ्यांना ६ महिन्यांच्या कालावधीत पेन्शनचे लाभ मिळालेच पाहिजेत, यासाठी मी PMPML प्रशासनाला पत्राद्वारे स्पष्ट सूचना दिल्या आहेत. कर्मचाऱ्यांच्या पाठीशी आमचे सरकार आणि प्रशासन सदैव खंबीरपणे उभे आहे.”
-अभिषेक बारणे, **सभापती-स्थायी समिती, पिंपरी चिंचवड महापालिका.**

# ‘माहेरच्या प्रॉपर्टीचा हिस्सा घेऊन ये’; सासरच्या जाचाला कंटाळून विवाहितेची आत्महत्या!

» पिंपरी | प्रतिनिधी

**हुंडाबळीचा आणखी एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. वाकड येथील एका उच्चभ्रू कुटुंबातील विवाहितेने सासरच्या छळाला कंटाळून आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या घटनेमुळे संपूर्ण शहरात संताप आणि हळहळ व्यक्त होत आहे. शिल्पा सचिन गवारे (वय ४२) असे मृत विवाहितेचे नाव आहे. रक्षाबंधन सणाच्या आदल्या ही दुर्दैवी घटना घडल्याने माहेरच्या कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.**



मिळालेल्या माहितीनुसार, शिल्पा गवारे यांचा विवाह वाकड परिसरातील गवारे कुटुंबात झाला होता. लग्नानंतर काही काळातच सासरच्या मंडळींकडून त्यांचा शारीरिक आणि मानसिक छळ सुरू झाल्याचा आरोप आहे. “तुझ्या माहेरच्या प्रॉपर्टीमध्ये तुझा हिस्सा मागून घे आणि तो घेऊन ये,” असा तगादा पती आणि सासरच्या मंडळींकडून लावला जात असल्याचे माहेरच्या नातेवाइकांनी तक्रारीत म्हटले आहे.

माहेरच्या संपत्तीतील हिस्सा मिळवण्यासाठी शिल्पा यांच्यावर सातत्याने दबाव टाकला जात होता. याच कारणावरून त्यांना शिवीगाळ तसेच मारहाण केली जात असल्याचा आरोपही त्यांच्या माहेरच्या मंडळींनी केला आहे. या सततच्या त्रासामुळे शिल्पा मानसिकदृष्ट्या त्रस्त झाल्या होत्या, असेही तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

सासरच्या मंडळींकडून होणारा कथित छळ आणि मारहाण सहन न झाल्याने शिल्पा यांनी अखेर आत्महत्या केल्याचा आरोप त्यांच्या नातेवाइकांनी केला आहे. घटनेनंतर शिल्पा यांचा भाऊ तथा उद्योजक संतोष कलाटे यांनी वाकड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली.

कलाटे यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी शिल्पा यांचे पती सचिन गवारे, सासरे आणि दीर यांच्याविरोधात हुंडाबळी तसेच कौटुंबिक छळवणुकीच्या कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणातील आरोपांची पोलीस चौकशी करत असून, शिल्पा यांच्या आत्महत्येमागील नेमकी परिस्थिती आणि सासरच्या मंडळींची भूमिका याबाबत तपास सुरू आहे.

भावा-बहिणीच्या प्रेमाचा सण असलेल्या रक्षाबंधनच्या अवघ्या एक दिवस आधी शिल्पा यांनी जीवन संपवल्याने त्यांच्या माहेरच्या कुटुंबावर मोठा आघात झाला आहे. बहिणीच्या हातून राखी बांधून घेण्याची तयारी असतानाच तिच्या मृत्यूची बातमी समोर आल्याने भाऊ संतोष कलाटे आणि कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला.


या घटनेमुळे परिसरातही हळहळ व्यक्त होत असून, शिल्पा यांच्या मृत्यूला जबाबदार असणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी त्यांच्या नातेवाइकांकडून करण्यात आली आहे. दरम्यान, वाकड पोलीस या प्रकरणाचा तपास करत आहेत.

# अनधिकृत बांधकामांवर पालिकेचा हातोडा; कारवाईचे आदेश!

## अनधिकृत टपऱ्या आणि नव्याने सुरू होणारी बांधकामे तातडीने हटवा!

**पिंपरी | प्रतिनिधी**

**पिंपरी-चिंचवड शहरातील अनधिकृत बांधकामे, अतिक्रमणे आणि अनधिकृत टपऱ्यांविरोधातील कारवाईला आता वेग देण्याचे निर्देश महापालिका प्रशासनाने दिले आहेत. केवळ नागरिकांच्या तक्रारींची वाट न पाहता क्षेत्रनिहाय नियमित सर्वेक्षण करून अनधिकृत बांधकामे शोधावीत आणि त्यांच्यावर तातडीने निष्कासनाची कारवाई करावी, असे स्पष्ट निर्देश अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांनी दिले.**



महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या निर्देशानुसार सोमवारी (२४ ऑगस्ट) पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय भवनातील मधुकर पवळे सभागृहात अनधिकृत बांधकामे, अतिक्रमणे आणि अनधिकृत टपऱ्यांवरील कारवाईचा आढावा घेण्यासाठी महत्त्वाची बैठक झाली. बैठकीत शहरातील सर्व क्षेत्रीय कार्यालयांमधील बीट निरीक्षकांच्या कामकाजाचा सविस्तर आढावा घेण्यात आला. अनधिकृत बांधकामे आणि अतिक्रमणांवर केवळ तक्रारी आल्यानंतर कारवाई न करता अधिकाऱ्यांनी स्वतःहून परिसराची नियमित पाहणी करून कारवाईला गती द्यावी, असे स्पष्ट निर्देश अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांनी दिले.

प्रत्येक बीट निरीक्षकाने आपल्या कार्यक्षेत्रातील रस्ते, मोकळे भूखंड, सार्वजनिक जागा आणि इतर संवेदनशील ठिकाणांची नियमित पाहणी करावी. नव्याने सुरू झालेली किंवा सुरू असलेली अनधिकृत बांधकामे तातडीने निदर्शनास आणून त्यांचे सर्वेक्षण करावे. बांधकाम अनधिकृत असल्याचे आढळल्यानंतर संबंधित नियमांनुसार निष्कासनाची कारवाई करण्यासाठी आवश्यक नियोजन करावे, अशा सूचना देण्यात आल्या.

> “अनधिकृत बांधकामे आणि अतिक्रमणांवर सातत्याने प्रभावी कारवाई करणे ही महापालिकेची जबाबदारी आहे. बीट निरीक्षकांनी त्यांच्या कार्यक्षेत्राची नियमित पाहणी करून नव्याने होणारी अनधिकृत बांधकामे तातडीने निदर्शनास आणावीत. महापालिकेच्या मालकीच्या भूखंडांवरील अतिक्रमणे, अनधिकृत टपऱ्या आणि पदपथांवरील अतिक्रमणे प्राधान्याने हटविण्यात येत आहेत. प्रतिबंधात्मक उपाययोजनांवरही भर देण्यात येत आहे. या कामात हलगर्जीपणा झाल्यास संबंधितांची जबाबदारी निश्चित करून नियमानुसार कारवाई केली जाईल.”
>
> -डॉ. विजय सूर्यवंशी, आयुक्त, पिंपरी-चिंचवड महापालिका.

महापालिकेच्या मालकीच्या भूखंडांवरील अतिक्रमणांना या कारवाईत विशेष प्राधान्य देण्यात आले आहे. तसेच शहरातील विनापरवाना उभारलेल्या टपऱ्या आणि सार्वजनिक पदपथांवरील अतिक्रमणे हटवून नागरिकांसाठी पदपथ मोकळे करण्याचे निर्देश देण्यात आले. त्यामुळे येत्या काळात शहरातील प्रमुख रस्ते, पदपथ आणि महापालिकेच्या जागांवरील अतिक्रमणांवर कारवाईचा वेग वाढण्याची शक्यता आहे.

अतिक्रमणांबाबत नागरिकांकडून तक्रार प्राप्त झाल्यानंतरच संबंधित विभागाने हालचाल करण्याची पद्धत न ठेवता प्रतिबंधात्मक कारवाईवर भर देण्याचे निर्देशही सांडभोर यांनी दिले. एखादे अनधिकृत बांधकाम पूर्ण होण्याची किंवा अतिक्रमण वाढण्याची वाट न पाहता ते सुरुवातीच्या टप्प्यातच शोधून त्यावर कारवाई करावी, अशी भूमिका प्रशासनाने घेतली आहे.

कारवाई प्रभावीपणे राबविण्यासाठी आवश्यक मनुष्यबळ, वाहने आणि यंत्रसामग्रीचे योग्य नियोजन करण्याच्या सूचना देण्यात आल्या. विविध विभाग आणि क्षेत्रीय कार्यालयांमध्ये समन्वय ठेवून निष्कासन मोहीम राबविण्याचेही सांगण्यात आले. त्यामुळे कारवाईदरम्यान मनुष्यबळ किंवा यंत्रसामग्रीअभावी विलंब होऊ नये, याची खबरदारी घेण्याचे निर्देश प्रशासनाने दिले आहेत.

दरम्यान, अनधिकृत बांधकामे आणि अतिक्रमणांवरील कारवाईत कोणत्याही प्रकारची दिरंगाई किंवा हलगर्जीपणा सहन केला जाणार नाही, असा स्पष्ट इशारा देण्यात आला. आपल्या कार्यक्षेत्रातील अनधिकृत बांधकामांकडे दुर्लक्ष करणाऱ्या किंवा कारवाई करण्यात टाळाटाळ करणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांची जबाबदारी निश्चित केली जाणार आहे. संबंधितांवर नियमानुसार कारवाई केली जाईल, असे प्रशासनाने स्पष्ट केले.

या बैठकीला बांधकाम परवानगी विभागाचे सहशहर अभियंता सुनील बागवानी, कार्यकारी अभियंता, उपअभियंता, सर्व क्षेत्रीय अधिकारी आणि बीट निरीक्षक उपस्थित होते. शहरातील अनधिकृत बांधकामे आणि अतिक्रमणांवर सातत्याने लक्ष ठेवून त्यांना सुरुवातीलाच आळा घालण्याची जबाबदारी क्षेत्रीय अधिकाऱ्यांवर सोपविण्यात आली आहे.

# निगडी प्राधिकरण येथे चेंबरमध्ये अडकून दोन कामगारांचा दुर्दैवी मृत्यू!

**पिंपरी | प्रतिनिधी**

**शहरातील निगडी प्राधिकरण परिसरात लोकमान्य हॉस्पिटलजवळ असलेल्या एका चेंबरमध्ये अडकून दोन तरुण कामगारांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. अमोल शिंदे (वय 23) आणि मनोज शिंदे (वय 19) अशी मृत कामगारांची नावे असून, या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.**



मिळालेल्या माहितीनुसार, बुधवारी मध्यरात्री सुमारे १२ वाजण्याच्या सुमारास दोन कामगार बीएसएनएलच्या चेंबरमध्ये अडकल्याची माहिती मिळताच पोलीस आणि अग्निशमन दलाच्या पथकांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन बचावकार्य सुरू करण्यात आले. अथक प्रयत्नांनंतर दोन्ही कामगारांना चेंबरमधून बाहेर काढण्यात आले आणि तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, डॉक्टरांनी तपासणीनंतर दोघांनाही मृत घोषित केले. मृत्यूचे नेमके कारण शवविच्छेदन अहवालानंतर स्पष्ट होणार असल्याचे पोलिसांनी सांगितले आहे.

दरम्यान, या घटनेमुळे कामगारांच्या सुरक्षेचा गंभीर प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. कोणत्याही प्रकारची पुरेशी सुरक्षा व्यवस्था न करता कामगारांना धोकादायक चेंबरमध्ये उतरवण्यात आले का, असा सवाल उपस्थित केला जात आहे. भूमिगत चेंबरमध्ये काम करताना ऑक्सिजनची पातळी तपासणे, विषारी वायूंची शक्यता पडताळणे, आवश्यक सुरक्षा साधने उपलब्ध करून देणे आणि आपत्कालीन परिस्थितीत बचावासाठी योग्य व्यवस्था ठेवणे गरजेचे असते. मात्र, या दुर्घटनेच्या वेळी अशा उपाययोजना प्रत्यक्षात करण्यात आल्या होत्या का, याचा तपास होणे आवश्यक आहे.

विशेष म्हणजे, गेल्या वर्षी १५ ऑगस्ट २०२५ रोजी याच बीएसएनएल चेंबरमध्ये ऑप्टिकल फायबरच्या कामादरम्यान मोठी दुर्घटना घडली होती. त्या दुर्घटनेत दत्ता होलारे, लखन धावरे आणि साहेबराव गिरसेप या तीन कंत्राटी कामगारांचा गुदमरून मृत्यू झाला होता. त्या घटनेनंतरही आवश्यक सुरक्षा उपाययोजना प्रभावीपणे राबविण्यात आल्या नसल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. त्यामुळे एकाच ठिकाणी पुन्हा अशाच स्वरूपाची जीवघेणी दुर्घटना घडल्याने संबंधित यंत्रणा आणि कंत्राटदारांच्या कामकाजावर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

मागील दुर्घटनेतून संबंधितांनी धडा घेतला का, असा सवाल आता उपस्थित होत आहे. कामगारांना चेंबरमध्ये उतरण्यापूर्वी सुरक्षेच्या दृष्टीने आवश्यक तपासणी करण्यात आली होती का? कामगारांकडे आवश्यक सुरक्षा उपकरणे होती का? चेंबरमध्ये विषारी वायू किंवा ऑक्सिजनच्या कमतरतेची तपासणी करण्यात आली होती का? तसेच कामगारांच्या सुरक्षेसाठी घटनास्थळी कोणती व्यवस्था करण्यात आली होती, याचा तपास होणे गरजेचे आहे.

एकाच ठिकाणी वर्षभराच्या अंतराने पुन्हा दोन कामगारांचा मृत्यू झाल्याने स्थानिक नागरिकांमध्ये तीव्र संतापाची भावना आहे.

### वर्षभरानंतर पुन्हा चेंबर ठरले ‘डेथ ट्रॅप’

दोषींवर कठोर कारवाई होणार का आणि भविष्यात अशा दुर्घटना टाळण्यासाठी ठोस सुरक्षा उपाययोजना केल्या जाणार का, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.मृत्यूचे नेमके कारण शवविच्छेदन अहवालातून स्पष्ट होणार असून, त्यानंतर तपासाला अधिक दिशा मिळण्याची शक्यता आहे. दरम्यान, एकाच चेंबरमध्ये पुन्हा दोन कामगारांचा जीव गेल्याने हा केवळ अपघात आहे की सुरक्षेच्या नियमांकडे झालेल्या दुर्लक्षाचा परिणाम, याचा उलगडा तपासातून होणे गरजेचे आहे.


# गणेशोत्सवात हाय डेसीबल डीजेला 'नो एंट्री'

## प्रेशर-मिड सिस्टीम आणि प्रेशर हॉर्नवर बंदी; मंडळांवर कारवाईचा इशारा

**» पुणे | प्रतिनिधी**

**आगामी गणेशोत्सव आणि दहीहंडी उत्सवादरम्यान ध्वनिप्रदूषणाला आळा घालण्यासाठी पुणे पोलिसांनी यंदा कठोर भूमिका घेतली आहे. गणेशोत्सव साजरा करण्यास कोणताही विरोध नसला तरी निर्धारित ध्वनिमर्यादेचे उल्लंघन करणाऱ्या मंडळांची ध्वनियंत्रणा जागेवरच जप्त केली जाईल, असा स्पष्ट इशारा पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी दिला आहे. त्यामुळे उत्सवाच्या नावाखाली कानठळ्या बसविणारा हाय डेसीबल डीजे वाजविणाऱ्या मंडळांवर पोलिसांची करडी नजर राहणार आहे.**





> "उत्सव साजरा करण्यास अजिबात विरोध नाही. मात्र अत्यंत मोठ्या आवाजातील डीजे सहन केले जाणार नाही. निर्धारित डेसिबल मर्यादेतच लाऊडस्पीकर वापरण्यास परवानगी असेल. साउंड मीटरच्या सहाय्याने पोलीस पथके प्रात्यक्षिके आणि तपासणी करतील. प्लाझ्मा स्पीकर कॅबिनेट, प्रेशर-मिड सिस्टीम आणि प्रेशर हॉर्नचा वापर टाळावा. तपासणीत नियमांचे उल्लंघन आढळल्यास तत्काळ कारवाई केली जाईल."
>
> -अमितेश कुमार, पोलीस आयुक्त, पुणे

गणेशोत्सव आणि दहीहंडीच्या पार्श्वभूमीवर पुणे महापालिकेत विविध नागरी विभागांचे प्रतिनिधी, पोलीस प्रशासन आणि गणेश मंडळांच्या पदाधिकाऱ्यांची समन्वय बैठक झाली. उत्सव काळातील गर्दीचे नियोजन, वाहतूक व्यवस्था, ध्वनिप्रदूषणाला आळा घालणे आणि उत्सव शांततेत पार पाडण्यासाठी आवश्यक उपाययोजनांवर बैठकीत चर्चा करण्यात आली.

यावेळी पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी गणेश मंडळांना ध्वनिमर्यादेचे काटेकोर पालन करण्याच्या सूचना दिल्या. उत्सव साजरा करण्यावर कोणतेही निर्बंध नसतील; मात्र अत्यंत मोठ्या आवाजातील डीजे आणि क्षमतेपेक्षा जास्त ध्वनियंत्रणा सहन केली जाणार नाही, असे त्यांनी स्पष्ट केले.

'या' ध्वनियंत्रणांवर पोलिसांची बंदी.अत्यंत मोठ्या आवाजाची निर्मिती करणाऱ्या प्लाझ्मा स्पीकर कॅबिनेट, प्रेशर-मिड सिस्टीम आणि प्रेशर हॉर्न यांच्या वापरावर यंदा गणेशोत्सव काळात बंदी घालण्यात आली आहे. त्यामुळे गणेश मंडळांनी ध्वनियंत्रणा उभारताना या उपकरणांचा वापर करू नये, अशा स्पष्ट सूचना पोलिसांकडून देण्यात आल्या आहेत.

ध्वनिप्रदूषणावर नियंत्रण ठेवण्यासाठी पोलीस पथकांकडून साउंड मीटरच्या सहाय्याने तपासणी केली जाणार आहे. मंडळांच्या प्रात्यक्षिकांपासून ते उत्सवातील प्रत्यक्ष कार्यक्रमांपर्यंत ध्वनीची पातळी तपासली जाण्याची शक्यता आहे. निर्धारित मर्यादेपेक्षा आवाज अधिक असल्याचे आढळल्यास संबंधितांवर तत्काळ कारवाई केली जाणार आहे.

ध्वनिपातळीची कमाल मर्यादा ७५ डेसिबल असली तरी परिसर आणि वेळेनुसार लागू होणारी ध्वनिमर्यादा बदलते. त्यामुळे गणेश मंडळांनी केवळ ७५ डेसिबलचा आधार न घेता संबंधित ठिकाण आणि वेळेनुसार लागू असलेल्या नियमांचे पालन करणे आवश्यक आहे.

पोलिसांनी यंदा कारवाईबाबत कोणतीही तडजोड केली जाणार नसल्याचे स्पष्ट केले आहे. निर्धारित ध्वनिमर्यादेचे उल्लंघन करणाऱ्या मंडळांची ध्वनियंत्रणा तत्काळ जप्त केली जाईल. त्यामुळे उत्सवाच्या काळात नियमांचे उल्लंघन करून मोठ्या आवाजात डीजे वाजविणाऱ्या मंडळांना थेट कारवाईला सामोरे जावे लागू शकते.

पोलीस प्रशासनाकडून उत्सव साजरा करण्यास विरोध नसून नागरिकांना त्रास होईल अशा पद्धतीने होणाऱ्या अतिरिक्त ध्वनिप्रदूषणाला विरोध असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. विशेषतः निवासी भाग, रुग्णालये, शाळा, महाविद्यालये आणि संवेदनशील परिसरांमध्ये ध्वनीच्या नियमांचे पालन करण्यावर अधिक भर राहणार आहे.

गणेशोत्सव हा उत्साहाचा आणि भक्तीचा सण असला तरी ध्वनिप्रदूषणामुळे नागरिकांना त्रास होणार नाही, याची जबाबदारी मंडळांनी घ्यावी, असे पोलिसांनी स्पष्ट केले आहे. त्यामुळे मंडळांनी ध्वनियंत्रणा उभारताना नियम तपासूनच त्याचा वापर करावा आणि प्लाझ्मा स्पीकर, प्रेशर-मिड सिस्टीम प्रेशर हॉर्नचा वापर टाळावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# पुण्यात H1N1चा कहर! ऑगस्टमध्ये २०५ रुग्ण; रुग्णसंख्येत अधिक वाढ!

**» पुणे | प्रतिनिधी**

**पुणे शहरात H1N1च्या रुग्णसंख्येत ऑगस्ट महिन्यात अचानक मोठी वाढ झाल्याचे महापालिकेच्या आरोग्य विभागाच्या आकडेवारीतून समोर आले आहे. ऑगस्टअखेर शहरात तब्बल २०५ H1N1 रुग्णांची नोंद झाली आहे. विशेष म्हणजे, जुलैमध्ये केवळ २५ रुग्ण आढळले होते. त्यामुळे अवघ्या एका महिन्यात रुग्णसंख्येत आठपटीहून अधिक वाढ झाली आहे. जानेवारी ते ऑगस्टदरम्यान पुणे शहरात H1N1च्या एकूण २६० रुग्णांची नोंद झाली आहे.**




## H1N1ची धास्ती नको! पुण्यात एकाही मृत्यूची अधिकृत नोंद नाही!

H1N1चा संशय असलेल्या मृत्यूंची अधिकृत पुष्टी करण्यापूर्वी नियुक्त समितीकडून सविस्तर तपासणी केली जाते. सध्या पुणे शहरात H1N1मुळे एकाही मृत्यूची अधिकृत पुष्टी झालेली नाही, असे आरोग्य विभागाने स्पष्ट केले आहे. त्यामुळे ऑगस्टमधील रुग्णसंख्येतील मोठी वाढ चिंताजनक दिसत असली तरी सध्या शहरात समूह संसर्ग नसल्याने नागरिकांनी घाबरून न जाता आरोग्यविषयक खबरदारी घेण्याचे आवाहन आरोग्य विभागाकडून करण्यात येत आहे. बदलते हवामान, हंगामी इन्फ्लुएंझा आणि वाढलेली रोगनिगराणी यामुळे पुढील काळात रुग्णसंख्येवर आरोग्य विभागाची विशेष नजर राहणार आहे.

चालू वर्षाच्या पहिल्या सहामाहीत H1N1चा प्रादुर्भाव तुलनेने कमी होता. जानेवारीमध्ये एकही रुग्ण आढळला नव्हता. फेब्रुवारीमध्ये दोन, मार्चमध्ये एकही रुग्ण नाही, एप्रिलमध्ये पाच, मेमध्ये १० आणि जूनमध्ये १३ रुग्णांची नोंद झाली. जुलैमध्ये रुग्णसंख्या २५ वर पोहोचली. मात्र, ऑगस्टमध्ये अचानक २०५ रुग्ण आढळल्याने आरोग्य यंत्रणेचे लक्ष या वाढीकडे वेधले गेले आहे.

महापालिका आरोग्य विभागाच्या अधिकारी डॉ. वैशाली जाधव यांनी या वाढीमागे बदलते हवामान आणि इन्फ्लुएंझाचा हंगामी पॅटर्न असल्याचे सांगितले. सध्या शहरासह परिसरात हवामानात सातत्याने बदल होत असून, काही वेळा पाऊस तर काही वेळा ऊन अशी परिस्थिती निर्माण होत आहे. या बदलत्या वातावरणामुळे हंगामी आजारांच्या रुग्णसंख्येत वाढ होण्याची शक्यता असल्याचे आरोग्य विभागाने स्पष्ट केले.

आरोग्य विभागाच्या माहितीनुसार, H1N1च्या रुग्णसंख्येत एक वर्षाआड वाढ होण्याची प्रवृत्तीही दिसून येते. त्यामुळे ऑगस्टमध्ये झालेली सध्याची वाढ पूर्णपणे असामान्य नसल्याचे डॉ. वैशाली जाधव यांनी स्पष्ट केले आहे. शहरात इन्फ्लुएंझाचे रुग्ण विविध भागांत आढळत असून, एका विशिष्ट भागात मोठ्या प्रमाणात रुग्ण आढळल्याचे चित्र सध्या नाही.

H1N1च्या रुग्णसंख्येत वाढ होण्यामागे रोगनिगराणी यंत्रणेचा विस्तार हेही एक महत्त्वाचे कारण असल्याचे आरोग्य विभागाने सांगितले. यंदा H1N1ची माहिती देणाऱ्या केंद्रांची संख्या वाढली आहे. सरकारी तसेच खासगी रुग्णालयांकडून केंद्र सरकारच्या IHIP/IDSP पोर्टलवर ऑनलाइन रुग्णांची नोंद केली जात आहे. त्यामुळे पूर्वीच्या तुलनेत अधिक रुग्ण अधिकृत आकडेवारीत नोंदवले जात असल्याचे जाधव यांनी सांगितले.

रुग्णसंख्या वाढली असली तरी पुणेकरांनी घाबरून जाण्याचे कारण नसल्याचे महापालिका आरोग्य विभागाने स्पष्ट केले आहे.

# नेपाळच्या पुरात पुण्याचे 4 भाविक अडकले; तीचा मार्ग बंद!

## कैलास मानसरोवर यात्रेवरून परतताना तिबेटमधील जिलाँग शहरात अडकले चौघे

**»» पुणे | प्रतिनिधी**

**नेपाळमध्ये आलेल्या भीषण पुरामुळे कैलास मानसरोवर यात्रेवरून परतणारे पुण्यातील चार भाविक तिबेटमधील जिलाँग शहरात अडकून पडले आहेत. बुधवारी सकाळपासून नेपाळमधील रसुवा आणि नुवाकोट जिल्ह्यांमध्ये पुराच्या पाण्याने मोठ्या प्रमाणात नुकसान केले असून, नेपाळ सीमेवरील इमिग्रेशन कार्यालयच पुराच्या तडाख्यात वाहून गेल्याने या चारही भाविकांचा रस्तेमार्गे परतीचा मार्ग खुंटला आहे. जिल्हा प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, चौघेही सध्या सुखरूप असून त्यांना सुरक्षितपणे बाहेर काढण्यासाठी प्रशासनाकडून प्रयत्न सुरू आहेत.**



कैलास मानसरोवर यात्रा पूर्ण करून हे चौघे पुण्याकडे परतत होते. मात्र, नेपाळमध्ये अचानक निर्माण झालेल्या पूरस्थितीमुळे त्यांच्या परतीच्या प्रवासात मोठा अडथळा निर्माण झाला आहे. सीमेवरील महत्त्वाचे इमिग्रेशन कार्यालयच वाहून गेल्यामुळे सीमा पार करण्याची प्रक्रिया ठप्प झाली असून, रस्तेमार्गाने परतण्याचा पर्याय सध्या उपलब्ध नसल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे.

अडकलेल्या भाविकांमध्ये स्मिता पवार, योगिनी पाटील, दिनेश भोसले आणि पूजा भोसले यांचा समावेश आहे. हे चौघे पुण्यातून कैलास मानसरोवर यात्रेसाठी गेले होते. यात्रा पूर्ण करून परतीच्या मार्गावर असताना पुरामुळे त्यांना जिलाँग शहरात थांबावे लागले आहे.

दरम्यान, या चौघांपैकी स्मिता पवार आणि योगिनी पाटील यांना मानसरोवर परिसरातील अती उंचावरील प्रवासामुळे ऑक्सिजनची कमतरता जाणवू लागली होती. प्रकृती बिघडल्यानंतर त्यांना तातडीने खाली जिलाँग शहरात आणण्यात आले आणि ऑक्सिजन देण्यात आला. मात्र, त्यांना पुढील वैद्यकीय उपचारांची आवश्यकता असल्याचे सांगण्यात येत आहे.

जिलाँग येथील रुग्णालयात आवश्यक असलेल्या पुढील उपचारांची सुविधा मर्यादित असल्याने दोघींना अधिक चांगले वैद्यकीय उपचार मिळावेत, यासाठी जिलाँगमधून काठमांडूला एअरलिफ्ट करण्याची मागणी करण्यात आली आहे.

नेपाळमधील पुरामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीचे गांभीर्य यावरून लक्षात येते की, भारत-नेपाळ सीमेवरील इमिग्रेशन कार्यालयच पुराच्या पाण्यात वाहून गेले आहे. त्यामुळे कैलास मानसरोवर यात्रेवरून परतणाऱ्या या यात्रेकरूंसमोर सीमा पार करून भारतात परतण्याचा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे.

जिलाँग आणि आसपासच्या परिसरातही परिस्थिती सुरक्षित नसल्याने चौघांना रस्तेमार्गे पुढे जाणे धोकादायक ठरू शकते. त्यामुळे त्यांना प्रथम काठमांडूमध्ये एअरलिफ्ट करण्यात यावे, अशी विनंती करण्यात आली आहे. काठमांडूमध्ये आवश्यक वैद्यकीय उपचार तसेच पुढील प्रवासाची व्यवस्था करणे तुलनेने शक्य होईल, अशी अपेक्षा आहे.

दरम्यान, नेपाळमध्ये आलेल्या या भीषण पुरामुळे मोठ्या प्रमाणात जीवित आणि वित्तहानी झाली आहे. नेपाळ प्रशासनाच्या माहितीनुसार, आतापर्यंत १,५०० हून अधिक नागरिक बेपत्ता झाले असून २०० जणांचा मृत्यू झाला आहे. याशिवाय १३० भारतीय नागरिक नेपाळमधील पुरात बेपत्ता असल्याची अधिकृत आकडेवारी नेपाळ प्रशासनाने जाहीर केली आहे.

पूरस्थितीमुळे अनेक भागांतील वाहतूक व्यवस्था विस्कळीत झाली असून रस्ते, पूल आणि महत्त्वाच्या पायाभूत सुविधांचे मोठे नुकसान झाले आहे. त्यामुळे विविध ठिकाणी अडकलेल्या नागरिकांना सुरक्षित बाहेर काढण्याचे मोठे आव्हान प्रशासनासमोर आहे.


### पुण्याच्या चौघांना सुखरूप परत आणण्याचे आव्हान!

पुण्यातील हे चारही भाविक सध्या सुखरूप असल्याने त्यांच्या कुटुंबीयांना काहीसा दिलासा मिळाला आहे. मात्र, दोघींची बिघडलेली प्रकृती, परिसरातील पूरस्थिती आणि सीमेवरील इमिग्रेशन कार्यालय वाहून गेल्याने परतीचा मार्ग बंद झाल्यामुळे त्यांच्या सुरक्षित परतीसाठी तातडीने एअरलिफ्ट किंवा अन्य पर्यायी व्यवस्था करण्याची गरज निर्माण झाली आहे. प्रशासनाकडून या चौघांना सुरक्षितपणे काठमांडूमध्ये आणून त्यानंतर भारतात परतण्याची व्यवस्था कशी केली जाते, याकडे आता पुणेकरांचे लक्ष लागले आहे.

# श्रावणात मांसाहारासाठी हट्ट; नशेत मुलाचा वडिलांनी घेतला जीव!

**»» पुणे | प्रतिनिधी**

**श्रावण महिन्यात दारू पिऊन घरी आलेल्या मुलाने मांसाहारी जेवणाची मागणी केल्याने झालेल्या वादाचे पर्यवसान थेट खुनात झाले. पुण्यातील वारजे माळवाडी परिसरात वडिलांनी मुलाच्या डोक्यात आणि चेहऱ्यावर मारहाण करून त्याचा गळा आवळून खून केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. विशेष म्हणजे, मुलाच्या मृत्यूचा प्रकार लपवून ठेवल्याचा आरोप त्याच्या आईवरही करण्यात आला असून वारजे माळवाडी पोलिसांनी आई-वडिलांना अटक केली आहे.**




महेश भागवत गायकवाड (वय ३०, रा. रामनगर, वारजे माळवाडी) असे खून झालेल्या तरुणाचे नाव आहे. भागवत सूर्यभान गायकवाड (वय ६४) आणि पार्वती भागवत गायकवाड (वय ६०) अशी अटक करण्यात आलेल्या आई-वडिलांची नावे आहेत. याप्रकरणी महेशचा भाऊ गणेश भागवत गायकवाड (वय ३४) यांनी वारजे माळवाडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. २४ ऑगस्ट रोजी रात्री साडेदहा ते २५ ऑगस्ट रोजी पहाटे साडेचारच्या दरम्यान त्यांच्या राहत्या घरात ही घटना घडल्याचे पोलिसांनी सांगितले.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गणेश गायकवाड हे पेंटिंगचे काम करतात. त्यांचे आई-वडील आणि लहान भाऊ महेश हे शेजारीच वेगवेगळे राहत होते. महेश कोणतेही कामधंदे करत नव्हता. त्याला दारूचे व्यसन होते. सुमारे दहा वर्षांपूर्वी त्याचा विवाह झाला होता. मात्र, त्याच्या दारूच्या व्यसनामुळे पत्नी दोन मुलांना घेऊन माहेरी निघून गेली. त्यानंतर दोघांचा घटस्फोट झाला होता.

घटस्फोटानंतर महेश एकटाच राहत होता. जेवणासाठी तो आई-वडिलांकडे जात असे. मात्र, कामधंदा करण्याऐवजी दारू पिऊन घरी येत असल्याने त्याचे वडील भागवत यांच्याशी वारंवार वाद होत होते. दारू पिऊन आल्यानंतर महेश मांसाहारी जेवणाची मागणी करत असे. सध्या श्रावण महिना सुरू असल्याने आई-वडील मांसाहार बनवून देत नसल्याने या मुद्द्यावरून त्यांच्यात अनेकदा वाद होत असल्याचे पोलिसांच्या तपासात समोर आले आहे.

२४ ऑगस्ट रोजी रात्री महेश दारू पिऊन घरी आला. रात्री साडेदहाच्या सुमारास तो आपल्या घरी गेला. त्यानंतर पहाटे साडेचार वाजता त्याची आई पार्वती हिने गणेश यांना झोपेतून उठवले. 'महेश उठत नाही, त्याचे शरीर पूर्ण थंड पडले आहे. तू जाऊन बघ त्याला काय झाले आहे,' असे तिने गणेश यांना सांगितले.

गणेश आईसोबत महेशच्या घरी गेले असता महेश उताणा अवस्थेत झोपलेला दिसून आला. त्याला उठवण्यासाठी डोक्याखाली हात घातला असता गणेश यांच्या हाताला रक्त लागले. महेशच्या डोक्याला, नाकाला आणि तोंडाला जखमा झाल्याचे दिसून आले. तसेच त्याच्या गळ्याभोवती व्रण असल्याचेही आढळले. त्यानंतर गणेश यांनी नातेवाईकांना बोलावून घेतले. नातेवाईकांनी पोलिसांना घटनेची माहिती दिली.

पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत तपास सुरू केला. महेशच्या मृतदेहाचे शवविच्छेदन करण्यात आले. त्यामध्ये श्वसनावरोध तसेच डोक्यावरील आणि चेहऱ्यावरील जखमांमुळे त्याचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी नमूद केले.

दरम्यान, दारू पिऊन घरी आलेल्या महेशचा मांसाहारी जेवणावरून वडील भागवत यांच्याशी वाद झाला. संतापाच्या भरात भागवत यांनी महेशच्या डोक्यावर आणि चेहऱ्यावर मारहाण करून त्याला गंभीर जखमी केले आणि त्यानंतर गळा आवळून त्याचा जीव घेतल्याचा पोलिसांचा संशय आहे.